नियमित दिवाणी दावा क्र.५७/२०२४

**पॉवर ऑफ ॲटर्नी जाहिद मोहम्मद बिजले**
**यांच्यामार्फत अमिना अहमदखान सरनाईक व २**
**वि.**
**अल्ली मोहम्मद बिजले व २**

## नि.१५ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज तिऱ्हाईत इसम खदिजा अल्ली बिजले यांनी दि.प्र.सं.आदेश १ नियम १० (२) प्रमाणे वादीने त्यांना दाव्यात प्रतिवादी म्हणून समाविष्ट करून घ्यावे याकरीता दाखल केलेला आहे. त्यांचे थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादी क्र.१ अल्ली मोहम्मद बिजले त्यांचे पती असून ते दि.२२.०८.२०२४ मयत झाले आहेत. वादीने मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारस रेकॉर्डवर घेणे करीता अर्ज दाखल केले असून त्यामध्ये त्यांचे नाव समाविष्ट केले नाहीत. त्यामुळे त्या दावा मिळकतीच्या सहहिस्सेदार असल्यामुळे त्या आवश्यक पक्षकार आहेत. म्हणून त्यांना दाव्यात समाविष्ट करून घेणेबाबत वादीस आदेश करण्यात यावे.

२. मुळ वादी तर्फे विधीज्ञानी या अर्जावर म्हणणे दाखल केले असून नि.१३ कडील अर्जात अनावधानाने मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारस म्हणून खदिजा यांचे नाव नमुद करण्याचे राहून गेले आहे. वादीने सर्व वारसांची माहीती न दिल्यामुळे संपूर्ण वारसांची नावे नमुद करण्याचे राहून गेले. त्यामुळे योग्य तो आदेश करण्यात यावा.

३. वादी व प्रतिवादी क्र.२ आणि तिऱ्हाईत इसमातर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

४. येण प्रमाणे अर्ज व कथने पाहता वादीने मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी अर्ज नि.९, ११ व १३ दाखल केले. त्या अर्जामध्ये या अर्जाच्या अनुषंगाने आदेश पारीत करून मयत प्रतिवादी क्र.१ यांची पत्नी खदिजा अल्ली बिजले यांना दि.प्र.सं.आदेश १ नियम १० (२) प्रमाणे दाव्यात आवश्यक ते पक्षकार म्हणून समाविष्ट करून घेण्यासाठी निर्देशीत केले आहे. त्यामुळे या अर्जाचा हेतू संपुष्टात येतो. म्हणून पुढील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

**१.** तिऱ्हाईत इसमाचा नि.१५ कडील अर्ज मंजुर करण्यात येतो.

**२.** वादीने नि.९, ११ व १३ वरील आदेशाप्रमाणे मयत प्रतिवादी क्र.१ नुर मोहम्मद बिजले यांचे वारस मुलगा नुर, अस्लम व मुलगी आयशा प्रमाणे पत्नी खदिजा अल्ली बिजले यांना देखील समाविष्ट करावे.

सही/-

(वाय.सी. पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
चिपळूण.

ठिकाण – चिपळूण.
दिनांक – १५/०६/२०२६.

**- प्रमाणपत्र -**

मी हमी देतो की, सदरच्या पी. डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ आदेशामधील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | एम.इ.आरेकर, लघुलेखक श्रेणी–३ |
| न्यायालयाचे नाव | सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, चिपळूण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी. |
| आदेश घोषीत दिनांक | १५.०६.२०२६ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | १५.०६.२०२६ |
| आदेश अपलोड केलेले दिनांक | १५.०६.२०२६ |